वर्ष- १० अंक- ०७ मुंबई, मंगळवार, २ जानेवारी ते ८ जानेवारी २०२४ पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 जर तुम्हाला दुधातून घट्ट मलई काढाईची असेल, तर या हॅक फॉलो
3 → ऊर्जा संक्रमणासाठी हवे योग्य धोरण
हिंजवडीत कंपनीतील गॅसभट्टीच्या स्फोटात ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## अभिनेत्री बनण्याचं आमिष दाखवून शूट केले नग्न व्हिडीओ; पालघरमधील धक्कादायक प्रकार कसा झाला उघड?



**पालघर । प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात चित्रपटांसाठी ऑडिशन देण्याच्या बहाण्याने महिलांचे नग्न व्हिडिओ शूट केल्याप्रकरणी एका महिलेसह तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. पीडित तरूणी १८ वर्षांची असून अभिनेत्री बनण्यासाठी मुंबईत आली आहे. सध्या ती वसईत राहते. सिनेमात काम मिळविण्यासाठी ती विविध निमीर्ती कंपन्यांकडे (प्रॉडक्शन हाऊस) भेटी देत होती. दरम्यान १ नोव्हेंबर रोजी तिला एका कंपनीतून दूरध्वनी आला होता. आम्ही नवीन बेवसिरीज तयार करत असून त्यासाठी मुलाखत (ऑडीशन) देण्यासाठी या तरुणीला बोलावले. २ नोव्हेंबर रोजी पीडित तरूणी अनाळ्रा येथे गेली. तिथे तिला एक दिग्दर्शनक, एक कॅमेरामन, एक अभिनेता आणि एक महिला मेकअप आर्टीस्ट असे ४ जण भेटले. चौघांनी तिला एका एका लॉज मध्ये ऑडीशनसाठी नेले. तिथे तिला काही दृश्ये चित्रित करायची आहेत असे सांगून तिला फसवून अश्लील कृत्य करण्यास भाग पाडले. ही दृश्ये केवळ ऑडीशनचा भाग असून तिचा कुठे वापर केला जात नांही. सिनेसृष्टीत असं कराव लागते असे तिला सांगितले.

**गुन्हेगारांना कशी झाली अटक?**

मात्र यानंतर तिला या कंपनीमधील कुणाचाच कॉल आला नव्हता. दरम्यान, तिची दृश्ये विविध अश्लील संकेतस्थळावर प्रसारीत केल्या जार्णाया वेबसिरीज मध्ये टाकण्यात आल्याची माहिती तिला परिचितांकडून मिळाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर तिने अनाळा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी फसवणूक तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनयिमाच्या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हे प्रकरण पुढील तपासासाठी गुन्हे शाखा ३ कडे वर्ग करण्यात आले आहे. याप्रकरणी तांत्रिक तपास करून अनुजकुमार जैस्वाल (३०), सर्जू कुमार विश्वकर्मा (२५) तसे ३३ वर्षीय महिला आरोपी यांना अटक करण्यात आली.


**पोलिसांनी काय सांगितलं?**

याबाबत माहिती देताना गुन्हे शाखा ३ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांनी सांगितले की, आरोपी हे व्यावसायिक पोर्नोग्राफी करणारे आहे. ते बेकायदेशीरित्या अश्लील व्हिडियो बनवून प्रसारीत करत होते. त्यांनी पीडीत मुलीला बोल्ड बेवसिरिजसाठी ऑडीशन देण्यासाठी पुरूष जोडीदाराला सोबत घेऊन बोलावले होते. पहिल्यांदा त्यांनी साधारण ऑडीशन केले आणि दुर्सयावेळी पुन्हा बोलावले. यावेळी पीडीत तरुणी आणि तिच्या मित्राला प्रणय दृश्याचे ऑडीशन करायचे आहे असे सांगून संभोग करण्यास भाग पाडले. हे केवळ ऑडीशनचा भाग आहे असे सांगण्यात आले होते. मात्र त्यांनी ते कोठा नावाच्या ऍपवर तसेच इतर अश्लील संकेतस्थळावर प्रसिध्द केले होते. या अश्लील संकेतस्थळावरून दोनशे ते तीनशे रुपये आकारून या चित्रफिती बघता येत होत्या. त्यातून आरोपींना ४० हजार रुपये मिळाले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी कोठा ऍप बंद केले असून इतर अश्लील संकेतस्थळांना संपर्क करून त्या चित्रफिती काढण्यास सागितले आहे. मात्र या अश्लील चित्रफिती परदेशातून चालवल्या जात असल्याने त्यांच्यावर कारवाईसाठी अडचणी येत आहेत. आरोपींनी अनेक मुलींचे अशाप्रकारे चित्रिकरण केले असून त्या प्रसारीत केल्या आहेत.

## नैना प्रकल्प शेतकऱ्यांच्या हिताचा; नैनाचे मुख्य नियोजनकार रवींद्रकुमार मानकर यांची माहिती

**पनवेल। प्रतिनिधी,**

नैनाबाधित शेतकऱ्यांची मुख्य मागणी राज्यात सर्वत्र ग्रामीण भागात यूडीसीपीआर लागू केल्याप्रमाणे पनवेलमधील नैनाबाधित क्षेत्रात नगर रचना एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) लागू करावा ही होती. या मागणीवर पहिल्यांदा जाहीरपणाने स्पष्टीकरण देताना यूडीसीपीआरपेक्षा शेतकऱ्यांच्या हिताच्या तरतुदी नैना प्राधिकरणात केल्याची माहिती भाजपने रविवारी पनवेल शहरातील फडके नाट्यगृहात आयोजित केलेल्या निर्धार मेळाव्यात नैनाचे मुख्य



नियोजनकार रवींद्रकुमार मानकर यांनी दिले. ह्यमी स्वतः शेतक-याचा मुलगा असून शेतजमिनीतून विकसित भूखंडापर्यंत रस्ते मिळविण्यासाठी होत असलेल्या विविध अडचणींचा दाखला या वेळी दिला. तसेच नैना प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या ४० टक्के विकसित प्रत्येक भूखंडापर्यंत जास्तीत जास्त १५ मीटर (५० फूट) रुंदीचे रस्त्यांचे नियोजन केल्याचे सांगितले.

पाण्याचे नियोजन

नैना क्षेत्रातील पाण्याचे नियोजन सिडकोने केले आहे. नैना क्षेत्राला कोंढाणे धरणातून पाणी मिळणार आहे. सिडको हे धरण बांधत असून हे बांधकाम पूर्ण होण्यासाठी अजून पाच ते सहा वर्षे लागतील. परंतु तोपर्यंत नैना क्षेत्रातील रहिवाशांना पिण्याचे पाणी सध्या सिडकोच्या पाणीपुरवठा योजनेतून देण्याची सिडकोची तयारी असल्याचे स्पष्टीकरण मुख्य नियोजनकार मानकर यांनी दिले. पाण्यासोबत विजेच्या भविष्यातील तरतुदीसाठी भूखंड आरक्षित करून हे भूखंड महाराष्ट्र राज्य वीज वितरण व पारेषण या मंडळांना देण्याचे नैनाचे नियोजन असल्याचे मानकर म्हणाले. विशेष म्हणजे इतर कायद्यात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून विजेच्या तारा आणि विजेचे खांब उभारलेत त्यांना मोबदला मिळत नाहीत. नैना प्राधिकरणात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून विजेच्या तारा गेल्या आहेत. त्या शेतकऱ्यांनासुद्धा विकसित ४० टक्के भूखंड मिळणार असल्याचे मुख्य नियोजनकार मानकर यांनी आश्वासित केले.

## १४ हजार कोटींची रस्ते कामे; फेब्रुवारीपासून कामे सुरू करण्याचे सिडकोचे नैनाबाधित शेतकऱ्यांना आश्वासन

**पनवेल। प्रतिनिधी,**

नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र म्हणजे नैना प्राधिकरणातील १ ते १२ नगर परियोजनांमध्ये (टीपीएस) १४ हजार ३२० कोटी रुपयांच्या रस्ते बांधणीच्या कामाची निविदा जानेवारी महिन्यात पूर्ण झाल्यावर फेब्रुवारी महिन्यात या रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने सुरू होतील, असे आश्वासन सिडको मंडळाचे जनसंपर्क विभागाचे अधिकाऱ्यांनी रविवारी शेतकऱ्यांसोबत झालेल्या निर्धार मेळाव्यात दिले. यावेळी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी नैना क्षेत्राचा उल्लेख भविष्यात 'हवाई



शहर' असा केला.

भाजपने नैना प्राधिकरण हा प्रकल्प पनवेल व उरणच्या शेतकऱ्यांचा हिताचा असून याच नैनाचे फायदे सांगण्यासाठी रविवारी फडके नाट्यगृहात ही बैठक झाली. नैना प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन संवाद साधला. नैनाचे मुख्य नियोजनकार रवींद्र मानकर, सिडकोचे जनसंपर्क अधिकारी मोहन निनावे, समाधान खतकाळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

२०१३ सालच्या जानेवारी महिन्यात नैना प्राधिकरणाची घोषणा झाली. मात्र १० वर्षांत नैना क्षेत्रात विकास न झाल्याने शेतकरी संतापले. शेकाप व महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी राज्य सरकार आणि सिडको विरोधात विविध आंदोलने व उपोषण केली. अद्याप आंदोलकांची कोणतीही बैठक मुख्यमंत्र्यांसोबत झाली नाही. यादरम्यान नैना प्राधिकरणाच्या परियोजनांबाबत शेतकऱ्यांमधील संभ्रम दूर करण्यासाठी आ. प्रशांत ठाकूर व महेश बालदी यांनी शेतकऱ्यांसमवेत जाहीर बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये नैना प्राधिकरणाबाबत शेतकऱ्यांनी त्यांच्या अनेक समस्या मांडल्या. ॲवार्ड झालेल्या भूखंड रस्त्याकडेला असतानाही इतरांची घरे असलेल्या ठिकाणी आडबाजूला दिली जात असल्याचे शेतकऱ्यांनी मत मांडले. रस्ते, पाणी गटार या सोयी कधी बनविणार, जाहीर भूखंडांचे ताबे कधी देणार, सध्या ४० टक्के विकसित भूखंड देण्याचे सिडको मंडळाने मान्य केले आहे. मात्र ५० टक्के विकसित भूखंड मिळावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

## स्टेडियम उभारणीसाठी डोंबिवली जीमखान्याला २५ कोटींचा निधी; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा



**डोंबिवली। प्रतिनिधी,**

येथील डोंबिवली जीमखान्याच्या मैदानात स्टेडियम उभारणीसाठी २५ कोटींचा निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. या निधीमुळे अनेक वर्ष स्टेडियम उभारणीसाठी प्रयत्नशील असलेल्या जीमखाना व्यवस्थापनाचे आणि त्याच बरोबर खेळाडुंचे स्वप्न साकार होणार आहे. डोंबिवलीत सुससज्ज स्टेडि्अम नसल्याने क्रिकेटसह अनेक प्रकारच्या खेळांच्या स्पर्धांसाठी क्रीडा विषयक संस्थांना ठाणे, मुंबईतील स्टेडियमध्ये जावे लागते. डोंबिवली जीमखान्यात ही सुविधा उपलब्ध होणार असल्याने विविध खेळ प्रकारातील खेळाडूंनी समाधान व्यक्त केले आहे. स्टेडियम उभारणी करताना बॅडमिंटन, टेबल टेनिस, जॉगिंग ट्रॅक अशा विविध सुविधांचा प्राधान्याने विचार केला जाणार आहे, काही वर्षांपासून डोंबिवली जीमखान्यामध्ये स्टेडियम उभारणीला परवानगी द्यावी म्हणून जीमखाना व्यवस्थापनाने शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यापूर्वी नगरविकास मंत्री असताना त्यांच्या हा प्रकार निदर्शनास आणला होता. त्यामुळे यावेळी डोंबिवली जीमखान्याला भेट देताना यापूवीची माहिती लक्षात ठेऊन हा निधी जाहीर केला आहे, असे डोंबिवली जीमखान्याचे सचिव पर्णाद मोकाशी यांनी सांगितले. स्टेडियम उभारणी संदभार्तील सविस्तर आराखडा या भूखंडाची नियंत्रक एमआयडीसी विभागाला सादर केला आहे. त्यामध्ये काही बदल करून नवीन आराखडाही दाखल करण्यात आला आहे. एक रकमी निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्याने स्टेडियम उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## अर्धवेळ नोकरीचे आमिष दाखवून डोंबिवलीतील तरूणाची फसवणूक




**डोंबिवली। प्रतिनिधी,**

आपणास अर्धवेळ नोकरी देतो, असे आमिष दाखवून येथील टिळकनगर भागातील एका तरूणाची तीन भामट्यांनी गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत ऑनलाईन व्यवहारातून आणि माध्यमातून नऊ लाख ८७ हजार रूपयांची फसवणूक केली आहे.सुमीत ललित वार्ष्णेय (२८) असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव आहे. तो नोकरी करतो. शायला, प्रियंका, पवनकुमार अशी आरोपींची नावे आहेत. टिळकनगर पोलीस ठाण्यात सुमीत यांनी तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. पोलिसांनी सांगितले, ऑक्टोबरमध्ये आरोपींनी तक्रारदार सुमीत यांच्याशी व्हॉट्सअप, टेलिग्राम माध्यमातून संपर्क साधण्यास सुरूवात केली. सुमीतला अर्धवेळ नोकरीचे आमिष दाखविले. सुमीत सध्या नोकरी करत आहे. नोकरी व्यतिरिक्त अर्धवेळ काम करण्याची संधी मिळते म्हणून भामट्यांच्या बोलण्यावर सुमीतने विश्वास ठेवला. आरोपींनी सुमीतला विविध साधने पाठवून ते टप्पे पूर्ण करण्याचे लक्ष्य दिले. ते टप्पे पूर्ण करत असताना आरोपींनी सुमीतकडून टप्प्याने एकूण नऊ लाख ८७ हजार रुपए वसूल केले. ही रक्कम त्यांनी ऑनलाईन माध्यमातून वसूल केली. टप्पे पूर्ण केल्यानंतर सुमीत आरोपींकडे नोकरीची मागणी करू लागला. त्यानंतर त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन नंतर संपकार्ला प्रतिसाद देणे बंद केले. आपली ऑनलाईन माध्यमातून भामट्यांनी फसवणूक केली म्हणून तक्रारदाराने टिळकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

## लिडार सर्वेक्षण पूर्ण झाल्याचा महापालिकेचा दावा



**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

शहरातील सर्व मालमत्तांचे लिडार सर्वेक्षण पूर्ण केल्याचा दावा महापालिकेने केला आहे. या सर्वेक्षणामुळे मालमत्ता करक्षेत्रात न आलेल्या मालमत्तांचेही सर्वेक्षण करण्यात आले असून जमा होणाऱ्या मालमत्ता करामध्येही या सर्वेक्षणामुळे वाढ होणार असल्याचा दावा महापालिकेने केला होता. त्यामुळे मालमत्ता कर ८०० कोटींवर जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. लिडार सर्वेक्षणाचे काम करण्यात आलेल्या संबंधित कंपनीकडून ३ लाख ९ हजार मालमत्तांचे सर्वेक्षण करून मालमत्ता विभागाकडे देण्यात आले आहे. पालिकेच्या मालमत्ता विभागानेही या सर्वेक्षण करण्यात आलेल्या मालमत्तांची पुनर्पडताळणी काम सुरू केल्याची माहिती पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या प्रमुख व अतिरिक्त आयुक्तांनी दिली.

तर दुसरीकडे हे काम पूर्ण करण्यात आल्याचा दावा पालिकेने केल्यामुळे आगामी अर्थसंकल्पात लिडार सर्वेक्षणानुसार मालमत्ता कर वाढणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील मालमत्तांचा पालिकेच्या इतिहासात आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे केल्या गेलेल्या सर्वेक्षणामुळे शहरातील मालमत्तांची ठोस आकडेवारी प्राप्त होणार आहे. मालमत्ताचे सर्वेक्षण ड्रोनद्वारे करण्यात आले आहे. याबाबत लिडार सर्वेक्षण केलेल्या मे. सेन्सस टेक लि.च्या विजय भारती यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

मालमत्ता कर वसुलीत नक्की वाढ होणार का?

नवी मुंबई महापालिकेने अर्थसंकल्पात मालमत्ता कर वसुलीचे लक्ष ८०० कोटी ठेवण्यात आले आहे. परंतू आतापर्यंत झालेल्या लिडारच्या कामामुळे प्रत्यक्षात किती कर वाढेल याची ठोस आकडेवारी नाही. त्यामुळे या जवळजवळ २२ कोटी रुपये खर्चाच्या कामाचा नक्कीच पालिकेला फायदा होणार का याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.

## डोंबिवलीत गृहसेविकेकडून मालकाच्या घरात चोरी; 5 लाखाचा ऐवज लांबविला

**डोंबिवली। प्रतिनिधी,**

घरकामासाठी येणाऱ्या एका गृहसेविकेने डोंबिवलीत आपल्या मालकाच्या घरातील कपाटातील तिजोरीतून पाच लाखाचा ऐवज चोरून नेला आहे. मालकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी गृहसेविके विरूध्द गुन्हा दाखल करून तिला अटक केली.डोंबिवली पूवेर्तील गडकरी पथावरील सीकेपी हॉल जवळील सृष्टी सुदामा सोसायटीत हा प्रकार राजेश रामचंद्र सोमवंशी या ज्येष्ठ नागरिकाच्या घरात घडला आहे. रामनगर पोलिसांनी गृहसेविका साक्षी गणेश मोरे (३६) या गृहसेविकेला अटक केली आहे. ही गृहसेविका डोंबिवली पश्चिमेतील रेतीबंदर रस्त्यावरील उमेशनगर भागात राहते. मंगळवारी सकाळी गृहसेविका नेहमीप्रमाणे



मालक राजेश सोमवंशी यांच्या घरी कामासाठी आल्या होत्या. काम करत असताना राजेश यांची नजर चुकवून गृहसेविका साक्षी यांनी शयन खोलीतील कपाटातील तिजोरीतून सोन्याचे घड्याळ आणि रोख रक्कम असा एकूण चार लाख ९८ हजार रूपयांचा ऐवज चोरला, असे राजेश यांनी तक्रारीत म्हटले आहे. गृहसेविका निघून गेल्यानंतर कपाटातील आतील रचनेत काही बदल झाल्याचे राजेश यांना दिसले. त्यांनी तिजोरी तपासली तर त्यात ऐवज नव्हता. घरात चोरी झाली नसताना ऐवज गेला कोठे असा प्रश्न राजेश यांना पडला. त्यांनी गृहसेविकेकडे विचारणा केली. तिने याबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. राजेश यांनी साक्षी मोरे यांच्यावर संशय घेऊन तक्रार केली. पोलिसांनी साक्षी यांची चौकशी केली. त्यांच्या जबाबात तफावत आढळली. त्यामुळे मोरे यांनीच चोरी केली असल्याचे पोलिसांचे मत झाल्यावर साक्षी यांच्या विरूध्द गन्हा दाखल करून त्यांना अटक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या आणखी एकाविरोधात म्हाडाकडून गुन्हा दाखल

**मुंबई। प्रतिनिधी,**

म्हाडाच्या भरती परिक्षेत यशस्वी झालेल्या आणखी एका उमेदवाराने अंपगत्वाचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे प्रकरण समोर आले आहे. संबंधित उमेदवाराविरोधात म्हाडाकडून नुकताच खेरवाडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. म्हाडाच्या विविध संवगार्तील ५६५ पदांसाठीची भरती प्रक्रिया चांगलीच वादग्रस्त ठरली आहे. सुरुवातीला या पदभरतीसाठी २०२१ मध्ये होणारी परिक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे अचानक रद्द करण्यात आली आणि त्यानंतर भरती परिक्षेतील मोठा गैरप्रकार उघड झाला. त्यानंतर





२०२२ मध्ये मंडळाने संगणकीय पद्धतीने भरती परिक्षा घेतली. मात्र ही परिक्षाही वादात अडकली. या परिक्षेत तोतया उमेदवार बसल्याचा, गैरप्रकार केल्याचा आरोप झाला आणि शेवटी हा आरोप खरा सिद्ध झाला. या भरती परिक्षेत गुणवत्ता यादीतील ६० उमेदवारांनी गैरप्रकार केल्याचे चौकशीअंती सिद्ध झाले. या ६० जणांविरोधात खेरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. या गैरप्रकारानंतर म्हाडा प्राधिकरणाने भरतीतील यशस्वी उमेदवारांच्या कागदपत्रांची अत्यंत बारकाईने पडताळणी करून यशस्वी उमेदवारांना सेवेत रुजू करून घेतले. मात्र आता सेवेत रुजू केलेल्यांपैकी दोघांनी म्हाडाची फसवणूक केल्याची बाब समोर आली आहे. विकास ढोले याने आपण ७० टक्के दृष्टी गमावल्याचे प्रमाणपत्र सादर केले आणि तो वरिष्ठ लिपिक म्हणून सेवेत रुजू झाला. मात्र त्याने सादर केलेल्या प्रमाणपत्राबाबत साशंकता निर्माण झाल्याने त्याची बारकाईने पडताळणी करण्यात आली. तेव्हा हे प्रणामपत्र बनावट असल्याचे उघड झाले. बुलढाण्यातील शासकीय रुग्णालयाकडून असे कोणतेच प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार ढोलेविरोधात खेरवाडी पोलीस ठाण्यात काही दिवसांपूर्वीच गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर त्याला सेवेतून बडतर्फही करण्यात आले आहे. ढोलेपाठोपाठ आता ज्योतिर्लिंग कोल्हापूरे याच्याविरोधातही नुकताच खेरवाडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. कोल्हापुरे याची नियुक्ती उपअभियंतापदी झाली होती.

## वाशी खाडी पुलासाठी निधी उभारणीला वेग; पैशांची निकड पाहून सिडकोकडून २०० कोटींची वेगाने वसुली?

**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

वाशी येथे तिसऱ्या खाडी पुलाच्या निर्मितीच्या अखेरच्या टप्प्यात कोणतीही आर्थिक अडचण उभी राहू नये यासाठी रस्ते विकास महामंडळाने पैशांची वेगाने जुळवाजुळव सुरू केली आहे. या प्रकल्पाच्या अंतिम टप्प्यात ठेकेदारास ३५० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम पुढे करावी लागणार आहे. यासाठी सिडकोने या पुलासाठी देय असलेला २०० कोटी रुपयांचा निधी ठरवून दिलेल्या मुदतीपूर्वीच महामंडळाला सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

या पुलाची एक बाजू लोकसभा तर दुसरी बाजू आगामी विधानसभा निवडणुकांपूर्वी पूर्ण करण्यासाठी



सध्या कामाचा वेग वाढविण्यात आला आहे. त्यामुळे या कामासाठी लागणाऱ्या निधीची युद्धपातळीवर जुळवाजुळव सुरू केली असून यासाठी सिडकोला आपल्या वाट्याची रक्कम वेगाने भरणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यापूर्वी सिडकोकडून मंजूर करण्यात आलेला २०० कोटींचा हिस्सा महिन्याला १० कोटी याप्रमाणे २० हप्त्यांत देण्याचे ठरविण्यात आले होते. तसा करारही या दोन्ही प्राधिकरणांमध्ये झाला होता. मात्र वेगाने सुरू असलेल्या या प्रकल्पाच्या कामात तातडीने निधी उभा करण्याची आवश्यकता वाटू लागल्याने उरलेला १३० कोटी रुपयांचा निधी पाच हप्त्यांमध्ये वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ऑक्टोबर २०२० मध्ये एल ॲण्ड टी कंपनीस तीन वर्षांच्या मुदतीत हे काम पूर्ण करण्याचा कायार्देश महामंडळामार्फत देण्यात आला. त्यानुसार ऑक्टोबर २०२३ मध्ये या पुलाचे काम पूर्ण करावे असे ठरले होते. मात्र कांदळवनांचा अडथळा, त्यासाठी लागणाऱ्या पर्यावरणाच्या मंजुऱ्या यामुळे हे काम सुरू होण्यास वर्षाचा कालावधी गेला. त्यामुळे खाडी पुलांची कामे दिलेल्या मुदतीत पूर्ण झालेली नाहीत. करारानुसार सिडकोने महिन्याला १० कोटीप्रमाणे पैसे भरणा करावेत असा करार झाला होता. यापैकी ७० कोटी रुपये सात महिन्यांत सिडकोने भरणा केले होते.

सिडकोकडून हप्त्यात वाढ

सिडको आणि रस्ते विकास महामंडळात झालेल्या करारानुसार सिडको आपल्या हिश्शाचे २०० कोटी रुपये या कामासाठी २० महिन्यांत देईल असे ठरले होते.

# भाजीत मीठ जास्त झाले असल्यास या ५ टिप्स अवलंबवा

असं म्हणतात की मीठ असते तेव्हा कोणाचे त्याकडे लक्ष नसते. परंतु भाजीत किंवा वरणात नसल्यावर त्याची आठवण येते.भाजीत मीठ जास्त पडल्यावर कोणालाही ती भाजी खावीशी वाटत नाही. भाजीत मीठ जास्त झाले असल्यास काय करावं? आपण भाजी पुन्हा बनवू शकत नाही. भाजीत मीठ जास्त झाल्यास काय करावे चला जाणून घ्या.

1 जर कोरड्या भाजीत जास्त मीठ झाले तर आपण थोडं हरभरा डाळी चे पीठ भाजून भाजीत घाला. थोड्या वेळात, भाजीची चव देखील ठीक होईल आणि ती अधिक चवदार लागेल.

2 रसदार भाजीत मीठ जास्त झाले असल्यास त्यात थोडं पाणी घालून उकळवून घ्या. उशीर होत असेल तर भाजीत कणकेच्या गोळ्या घालू शकता. या मुळे मीठ कमी होईल.



3 बऱ्याच हिवाळा चायनीज फूड मध्ये मीठ जास्त झाले असल्यास त्यात थोडस लिंबाचा रस मिसळा.अन्नातून मीठ कमी होईल आणि चव चांगली राहील.

4 बऱ्याच वेळा रसदार भाजीत उकडलेला बटाटा देखील घालू शकता. ऐकण्यात विचित्र वाटत असेल तरी हे प्रभावी आहे. या मुळे भाजीतील किंवा वरणातील मीठ कमी होईल

5 अन्न सर्व्ह करताना शेवटच्या क्षणी कळते की भाजीत मीठ जास्त झाले आहे या साठी आपण भाजीत ब्रेडचा तुकडा घाला आणि सर्व्ह करताना हळूच काढून घ्या.

# जर तुम्हाला दुधातून घट्ट मलई काढाईची असेल, तर या हॅक फॉलो करा

बऱ्याचदा लोकांना ही समस्या असते की चांगल्या दजार्चे दूध असूनही घट्ट मलई मिळत नाही. तर अनेकजण दर आठवड्याला अर्धा किलो दुधापासून भरपूर मलई काढून घरी तूप बनवतात. इतकेच नाही तर जाड मलईसाठी लोक फुल क्रीमचो दूधही घेतात, पण मलई काढताना ते पातळ असते आणि कमी प्रमाणात असते. खरं तर, दुधात घट्ट मलई बनवण्याच्या काही सोप्या युक्त्या आणि हॅक आहेत. मिठाईच्या दुकानात मिठाईवाले अजूनही या खाचांचा अवलंब करतात. या देसी हॅकच्या मदतीने जर तुम्हाला घरच्या घरी जाड मलई काढायची असेल तर तुम्हाला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. उदाहरणार्थ, दुधाची गुणवत्ता, दूध उकळण्याची योग्य पद्धत आणि ते साठवण्यासाठी भांड्यांची निवड इ. चला तर मग आज आम्ही तुम्हाला जाड मलई काढून टाकण्यासाठी देसी हॅक्स सांगत आहोत.



अशा प्रकारे दुधातून घट्ट मलई काढा

फुल क्रीम दूध वापरा,

जाड मलई हवी असेल तर फॅट जास्त असलेले दूध घेणे चांगले. यासाठी टोन्ड दूध किंवा गाईच्या दुधाऐवजी फुल क्रीम दूध घेतल्यास मलई घट्ट होईल.

अशा प्रकारे दूध उकळवा

बहुतेक लोक फ्रीजमधून दूध काढून थेट उकळायला ठेवतात. पण आम्ही तुम्हाला सांगतो की असे केल्याने दुधातील मलई चांगल्या प्रकारे बाहेर पडत नाही. उकळण्याआधी साधारण 20 मिनिटे सामान्य तपमानावर ठेवणे चांगले होईल, त्यानंतरच ते उकळवा.

गरम दूध झाकून ठेवू नका

दूध उकळल्यावर लगेच झाकून ठेवू नका. जाळीच्या झाकणाने किंवा चाळणीने झाकून ठेवल्यास ते चांगले होईल. जेव्हा दूध सामान्य तापमानावर येते तेव्हाच प्लेटने झाकून ठेवा. असे केल्याने, जाड मलई रात्रभर दुधावर स्थिर होईल.

उकळताना चमच्याने ढवळत राहा

दूध उकळायला लागल्यावर गॅसची आंच कमी करा आणि चमच्याने किंवा पळीच्या मदतीने सतत ढवळत राहा. तुम्ही हे 4 ते 5 मिनिटांसाठी करा. तुम्हाला दिसेल की हळूहळू बुडबुडे कमी होऊ लागले आहेत. नंतर गॅस बंद करा. खोलीच्या तापमानावर आल्यानंतर ते फ्रीजमध्ये ठेवा.

ते मातीच्या भांड्यात साठवा

जेव्हा दूध खोलीच्या तापमानाला येते तेव्हा तुम्ही ते मातीच्या भांड्यात ठेवा. असे केल्याने दूध घट्ट होऊन त्यावर मलई चांगली बसते.

# घरीच एसीची स्वच्छता करण्यासाठी या टिप्स



उन्हाळ्यात एसीचा वापर होतो. उन्हाळा चालू असला तरी एसी अजून सुरू झालेला नाही. पण घामाघूम उन्हाळा आता दूर नाही. त्यामुळे घर आणि स्वतःला थंड ठेवण्यासाठी आताच व्यवस्था करणे चांगले होईल. अशा परिस्थितीत नवीन कूलर आणि एसी खरेदी करण्याबरोबरच जुना एसी आणि कुलर स्वच्छ करण्याकडेही लक्ष दिले पाहिजे.एअर कंडिशनर स्वच्छ करण्याचे काही सोपे आणि घरगुती उपाय सांगणार आहोत.

ज्यांना अवलंबवून आपण पैसे वाचवू शकता चला तर मग जाणून घेऊ या .

एसी साफ करणे आवश्यक आहे. एसी साफ न केल्यास त्यात धूळ साचू लागते. त्यामुळे हवेचा प्रवाह ठप्प होऊ लागतो. याव्यतिरिक्त, फिल्टरवर जमा झालेला मलबा कॉइलवर बर्फ तयार होऊ शकतो. याशिवाय एसी साफ न केल्यास श्वसनाचे आजार होण्याचा धोकाही वाढतो.

किती वेळा स्वच्छता करावी

एसीची कार्यक्षमता राखणे आवश्यक आहे. या प्रकरणात, तुमचा एसी कोणत्याही ब्रँडचा असू शकतो, एसीची साफसफाई दर महिन्याला 2 ते 3 वेळा करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, उन्हाळ्याच्या हंगामात, आपण दरमहा एसी स्वच्छ करू शकता आणि नवीन सारखे थंड मिळवू शकता.

एसी साफ न केल्यास असे सिग्नल देतो

फिल्टरमध्ये धूळ आणि घाण जमा करणे

एसी मधून थंड हवे ऐवजी गरम हवा येणे

एसीच्या बाहेरील छिद्रांवर बुरशी जमा होणे

एसी मधून विचित्र आवाज येणे

एसी मधून वास येणे

एसी कसे स्वच्छ करावे

सर्वप्रथम एसी बंद करा आणि त्याचे पॅनल उघडा.

नंतर एक एक करून एसी फिल्टर काढा.

आता टूथब्रशच्या मदतीने एसीमधील बाष्पीभवन कॉइलची घाण काळजीपूर्वक साफ करा.

आता यानंतर एसीवरील धूळ स्वच्छ कापडाने स्वच्छ करा.

फिल्टर स्वच्छ करण्यासाठी, ते पाण्याने धुवा. हे फिल्टर सहज आणि पूर्णपणे स्वच्छ करते.

फिल्टर पाण्याने धुतल्यानंतर, ते पूर्णपणे कोरडे करा. त्यानंतर ते पुन्हा त्याच्या जागी ठेवा.

यानंतर अउ पॅनल बंद करा आणि वीजपुरवठा चालू करा.

आउटडोअर युनिट अशा प्रकारे स्वच्छ करा

आउटडोअर युनिट साफ करण्यासाठी, प्रथम ग्रिल काढा आणि पंखा काढा. या दरम्यान, एसी बंद करण्याची खात्री करा. मऊ सुती कापडाच्या साहाय्याने पंखा पूर्णपणे स्वच्छ केल्यानंतर, रिकाम्या एअर कंडिशनर युनिटला पाण्याच्या दाबाने स्वच्छ करा. पूर्णपणे कोरडे झाल्यानंतरच युनिट पुन्हा वापरा.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

Water Supply & Sewerage Department
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhayandar (W) 401101, Tal. Dist. Thane 28192828

**No. MNP/WS & Sew/33/2023-24** **Date – 29/12/2023**

**//Tender Notice //**

Mira Bhayander Municipal Corporation's Water Supply Department has invited the tender for various works under water supply. The tender documents are available on www.mahatenders.gov.in website from Dt. 03/01/2024 to Dt. 10/01/2024 till 12.00 hrs. Tender shall submitted on www.mahatenders.gov.in website on or before Dt. 10/01/2024 upto 1.00 hrs.

(Deepak Khambit)
City Engineer
Mira Bhayander Municipal Corporation

**Place :**-Bhaindar
**Date :-** 29/12/2023

**Ref No. MBMC/PRO/E1217208/2023-24**
**Date – 29/12/2023**

## कथा/बोधकथा

# बुडबुड घागरी

तो टोपी घालणारा उंदिरमामा आठवतोय? तो गेला एकदा जंगलात. तिथे त्याला एक माकड आणि मांजर भेटले. त्या तिघांची चांगली मैत्री जमली. एक दिवस त्या तिघे मित्रांनी खीर बनविण्याचे ठरवले. माकड म्हणाले 'मी आणतो साखर'. मांजर म्हणाले 'मी आणते दूध'. उंदीर म्हणाला 'मी आणतो शेवया'. तिघांनी पातेलेभर खीर केली.


मग माकड म्हणाले 'चला आपण आंघोळ करून येऊ आणि मगच खीर खाऊ'. इकडे मांजराच्या तोंडाला पाणी सुटले होते. मांजर म्हणाली तुम्ही जा मी खीर शिजवते. माकड आणि उंदीर म्हणाले, ठीक आहे आणि ते दोघे आंघोळ करण्यासाठी जातात.

मांजरीच्या तोंडाला पाणी सुटणे ती थोडी खीर खाते .तेवढी खाऊन झाली पण तिला आणखी खावी वाटली. पुन्हा थोडी घेतली असे करत तिने सगळी खीर खाऊन टाकली . थोडया वेळाने माकड व उंदीर आले. पहातात तो काय, खिरीचे पातेले रिकामे ! त्यांनी मांजराला विचारले 'खीर कोणी खाल्ली?' मांजर म्हणाले, 'मला नाही माहीत.'

मग माकडाने एक घागर घेतली व सर्वजण नदीवर गेले. माकडाने घागर पाण्यात पालथी घातली. त्यावर उभे राहून माकड म्हणाले ' हुप हुप करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी'. पण घागर काही बुडाली नाही. मग उंदीर घागरीवर उभा राहिला व म्हणाला 'चूं चूं करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी'. पण घागर काही बुडाली नाही. आता मांजराची पाळी आली.

मांजर खरे तर घाबरले होते. कसेबसे ते घागरीवर उभे राहिले व म्हणाले ' म्यांव म्यांव करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड घागरी'. अन काय आश्चर्य, घागर पाण्यात बुडाली. चोरून खीर खाल्ल्याची मांजराला शिक्षा मिळाली.

**तात्पर्य – नेहमी खरे बोलावे**



# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**
**मुख्य कार्यालय विरार**
**दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३**

**जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१८४३/२०२३-२४**
**दिनांक :- २९.१२.२०२३**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | विभाग | मालमत्त | रिसीट नं | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव करदात्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे -१२ | NL२१/१६२/७३ | ४३०३ | विलास कुळ्ये | अजय विश्राम जोशी |
| २ | आचोळे -१२ | NL२१/२५९/४६ | - | कन्हैयालाल जयस्वाल | सविता द्वारकाप्रसाद बनिया/सुरज द्वारका बनिया |
| ३ | आचोळे -१२ | NL२१/१६०/३ | ४४१२ | एस.के. हाफिजुर रेहिमान | मोहम्मद अलाउद्दीन मोहम्मद नसीर अन्सारी |
| ४ | आचोळे -१२ | NL२१/२५९/७ | - | कन्हैयालाल जयस्वाल | वीरेंद्र हरगेन सिंह |
| ५ | आचोळे -१२ | NL२१/४१५/१ | ४४४३ | सरस्वती संतोष शर्मा | राजेश कुमार चंद्रदेव सिंह |
| ६ | आचोळे -१२ | NL२१/४०१/२ | ४४४५ | प्रेरणा उदय जाधव | राशी दिलीप चौधरी |
| ७ | आचोळे -१२ | NL२१/३१४/३६ | ४४४८ | महाजबीन फारुक शेख | महेक सय्यद |
| ८ | आचोळे -१२ | NL२१/३९५/३७ | ४४४९ | निलेश रेखईप्रसाद गुप्ता | रीना निलेश गुप्ता |
| ९ | आचोळे -१२ | NL२१/२९८/३२ | ४५१० | नवनाथ श्रीराम काळ्कोपरे | मोक्तार होस्सेन एस. के. |
| १० | आचोळे -१२ | NL२१/२५५/३० | ४५०८ | सय्यद मोहम्मद असकारी नाकवी | सनी प्रकाश वाघरे |
| ११ | आचोळे -१२ | NL२१/४०७/२७ | ४४९८ | पार्वतीबेन शंकर कोळी | भास्कर बाबुलाड |
| १२ | आचोळे -१२ | NL२१/१६२/५४ | ४५१७ | अनिल विश्र्वनाथ बोवने | अनिता अनिल बोवणे |
| १३ | आचोळे -१२ | NL२१/३२८/३८ | ४५५१ | अशरफ इकबाल शेख | चांद अली |
| १४ | आचोळे -१२ | NL२१/२८१/२० | ४५८० | मुमताज अब्दुल गपकार | कौसर रेहाना मो. साबीर हुसैन |
| १५ | आचोळे -१२ | NL२१/३३४/२४ | ४५७८ | उमेश सियाराम चौरसिया | हेमा उमेश चंन्द्र चौरसिया |
| १६ | आचोळे -१२ | NL२१/९४/१८ | ४५९५ | रामनयन आर निशाद | जयप्रकाश भगवानप्रसाद गुप्ता व आरती जयप्रकाश गुप्ता |
| १७ | आचोळे -१२ | NL२१/२२२/१६ | ४६०२ | उन्हाळेकर दिलीप शंकर | दिव्या दिलीप उन्हाळेकर |
| १८ | आचोळे -१२ | NL२१/२९३/४५ | ४६२० | राम अवतार पी. कुम्हार | सरजो देवी सुरज मल कुमावत |
| १९ | आचोळे -१२ | NL२१/२६८/८ | ४६२२ | पावती अंकुश मोहीत | उर्मिला राकेश मिश्रा व शिवम राकेश मिश्रा |
| २० | आचोळे -१२ | NL२१/२२०/३० | ४४२४ | अनंत आश्रय कंस्ट्र. | सुनिल तुकाराम मुगडे व रिया सुनिल मुगडे |

**सही/-**
**(सुरेश पाटील)**
**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# संपादकीय... वो सुबह कभी तो आयेगी...



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

भुकेपोटी पसरलेल्या हातावर कुण्या धनवंताने पेढा ठेवला तर त्यावर समाधान मानावे की दीड वितीचे पोट भरण्यासाठी आणखी कुणाकडे अपेक्षेने पाहावे? या याचकाच्या संभ्रमात सध्या सारे जग सापडले आहे. मिळाले ते अपुरे असले तरी त्याला प्रसादाचे मोल भासते, आणि अपुऱ्या अन्नाने पोट काही भरण्याची चिन्हे नाहीत. अभावातही भाव उराशी बाळगून जगण्याचे हे दिवस. जुने जाऊ द्या मरणांलागुनी असे सांगत कालचा दिनकर मावळला. पण आज उगवलेला सूर्य नव्या उद्याची आशीर्वचने उद्गगारतच आला आहे. नव्या उमेदीने त्याचे स्वागत करायला हवे.

अभावाच्या कहाण्या घेऊन गेलेला कालचा सूर्य आणि उद्याच्या आशावादाची उषागीते गात उगवलेला आजचा सूर्य, यातला कोणता खरा? या प्रश्नाचे उत्तर येत्या वर्षात मिळणार आहे, म्हणून त्याचे विशेष स्वागत करायला हवे. मावळत्या वर्षाने दिलेल्या पाथेयाच्या जोरावरच येत्या वर्षातली आणि भविष्यातली कालक्रमणा आपल्याला करायची आहे. गेल्या वषार्ने काय दिले नाही, याचे रडगाणे गाण्यापेक्षा, हाती काय पडले, याचा धांडोळा घेऊन पुढल्या कालप्रवासाला लागावे, हाच तर मनुष्यधर्म.

गेल्या वर्षात कितीतरी नव्या वाटा गवसल्या. वर्षाच्या सुरवातीलाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा नवा आविष्कार म्हणून चॅटजीपीटी नावाचे नवलाईचे प्रकरण आपल्या सेवेसी हाजिर झाले. हवा तो मजकूर काही सेकंदात तयार करणाऱ्या या सतत विकसित होणाऱ्या बुद्धिमत्तेची ओळख झाल्यावर जगताचे डोळे दिपले; पण त्यासोबत आलेली काही धोकादायक भुतेही दिसू लागली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग विधायक कामांसाठी जसा होतो, तसाच दुष्टांच्या हाती हे अस्त्र गेले की त्याची ओंगळ रुपे दिसू लागतात. या एआय नावाच्या भुताने एव्हाना जगाला झपाटले आहे, त्याचे विकसित अवतार तर मानवी बुद्धीलाच आव्हान देऊ शकतील, अशी शक्यता आहे. या कृत्रिम मेधेच्या जोरावर यंत्रमानवांनी माणसावरच अधिराज्य गाजवू नये, यासाठीही समांतर प्रयत्न चालू आहेत. थोडक्यात, या भविष्यातल्या भुतांना बाटलीबंद करण्याचे तातडीचे मंत्र वर्तमानातच शोधून काढावे लागणार आहेत. जनरेटिव एआय, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग हे आता नव्या पिढीच्या अंगवळणी पडू लागलेले शब्द. त्यात दिवसेंदिवस भर पडते आहे. नवी तंत्रज्ञाने किती विध्वंसक असू शकतात, याचीही चुणूक रशिया-युक्रेन आणि इस्त्राईल-हमासच्या युद्धात गेल्याच वर्षभरात दिसली. इंटरनेटच्या महाजालाच्या उदयानंतर जग हे एक खेडे भासू लागले होते. सरहद्दीची मिरास कमी झाल्यागत भास झाला होता. पण ते सारे आभासीच होते आणि राहिले. गेल्या काही वर्षात माणसाच्या दुनियेत प्रांतवाद, पैसा, आणि परधर्म या प कारांनी पंचाईतच केली. पृथ्वी नावाच्या ग्लोबल खेड्यामध्ये कितीतरी सामाजिक उतरंडी नव्याने निर्माण झाल्याचा साक्षात्कार मानवाला झाला. सगळ्या समाजांचे उजवीकरण होत असल्याचे दिसत आहे. जगभरातल्या तब्बल ५८ देशात नव्या वर्षात निवडणुकांचा खेळ होणार आहे, आणि लोकशाहीची मूल्ये अक्षरशः पणाला लागणार आहेत. मानवतेची जी मूल्ये उराशी बाळगून आपण इतकी वाटचाल केली, त्या मूल्यांचे नेमके काय करायचे, याचा फैसला करणारे वर्ष म्हणून येते वर्ष इतिहासात नोंदले जाईल.

भारताने तर यंदा चंद्रावर यान धाडले, आणि सूर्याकडेही यशस्वी झेप घेतली. तरीही विकासाची नवी स्वप्ने पाहणारा आपला देश अजूनही स्वप्नांच्याच पातळीवर चाचपडताना दिसतो आहे. या स्वप्नांच्या परिपूतीर्साठी निव्वळ शब्दांचे बुडबुडे कामाचे नाहीत. त्यासाठी झडझडून कामाला लागावे लागेल, तेही येत्या वर्षभरातच! नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी जुन्या कॅलेंडराची सद्दी संपते. इथून पुढे वर्षभर नवे कॅलेंडर आणि त्यातील नवे रंग, नव्या सुट्या, नवे दिवस. खरे तर कॅलेंडरातले रंग आपणच आपापल्या परीने भरत असतो. याच रंगीत दिवसांमध्ये कुठेतरी ती रम्य पहाट दडलेली आहे...

**वो सुबह कभी तो आयेगी, वो सुबह कभी तो आयेगी**

**इन काली सदियों के सर से जब रात कां आंचल ढलकेगा**

**जब दुख के बादल पिघलेंगे, जब सुख का सागर छलकेगा**

**जब अंबर झूम के नाचेगा, जब धरती नगमें गायेगी**

**वो सुबह कभी तो आयेगी...**

# ने मजसी ने... सत्वर अमेरिकेला!



लागोपाठ तिसऱ्या वर्षी विक्रमी संख्येने भारतीय विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेत प्रवास केला. 'ओपन डोअस' या अहवालानुसार, भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ३५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात दोन लाख ६८ हजार ९२३ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी व्हिसा मागितला. हा उच्चांक आहे. अमेरिकेत शिकणाऱ्या दहा लाखांहून अधिक परदेशी विद्यार्थ्यांपैकी भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण आता चीनपेक्षाही म्हणजे २५ टक्क्यांहून अधिक आहे. याच्या अगोदरच्या वर्षात ही संख्या एक लाख ९९ हजार १८२ इतकी होती.

या आकड्यांत युरोप, ऑस्ट्रेलिया, रशिया, न्यूझीलंड हे देश नाहीत. या बातमीमागे अनेक पदर दडलेले आहेत. आज पुणे-मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक मोठ्या शहरांतील अनेक मध्यमवर्गीय कुटुंबातील मुले व मुली परदेशी शिक्षणासाठी अमेरिकावासी झाली आहेत. पदवीचे शिक्षण भारतात व ते असतानाच एक डोळा अमेरिकेकडे लावून पदवीनंतर प्रवेश परीक्षा देऊन पुढचे शिक्षण अमेरिकेत हा प्रवासाचा पहिला टप्पा. त्यानंतर त्याच क्रमाने पदवी पूर्ण करणे, मग संशोधन अथवा नोकरीसाठी प्राधान्याने अमेरिका व त्यानंतर कॅनडा या ठिकाणी हे विद्यार्थी- विद्यार्थिनी बस्तान बसवत आहेत. हा टप्पा पार पडला की मग ग्रीन कार्ड व नागरिकत्व या पुढच्या पायऱ्या. अशा पद्धतीने २००० पूर्वी परदेशी शिक्षणास जाणाऱ्यांची संधी नव्हती व संख्या नव्हती असे नाही. पण गेल्या वीस वर्षात मध्यमवगार्तील अनेक कुटुंबे जशी उच्चमध्यम वर्गात सधन म्हणून स्थिरावली, तशी त्यांच्या मुलामुलांनी परदेशी शिक्षणाच्या संधी पूर्वीइतक्या अवघड राहिल्या नाहीत. संपर्कसाधनेही वाढली. प्रवास सुखाचे झाले.

अनेक परदेशी विद्यापीठांनी त्यांची कार्यालये किंवा विक्रीकेंद्रेही त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमाची जाहिरात करण्यासाठी भारतात उघडली. त्या ठिकाणी शिकून आल्यानंतर जे भारतात परतले त्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी त्यांच्या माजी संघटनेद्वारे पद्धतशीरपणे त्या त्या विद्यापीठाचा प्रचार भारतात कसा सुरु राहील, याची धोरणे आखली. इंग्रजीत याला 'ब्रँड बिल्डिंग' हा गोंडस शब्द आहे. अशी एकदा नाममुद्रा तयार झाली, की नवीन विद्यार्थी येण्याचाही सोय होते. पुढची पायरी म्हणजे भारतातीलच अनेक उद्योगपतींनी ते जिथून शिकून आले त्या विद्यापीठांना कोट्यवधी रुपयाच्या देणग्या त्यांच्या स्वतःच्या अथवा व्यवसायाच्या नावाने देऊ केल्या. त्या रकमेच्या आधारे विद्यापीठात संशोधनासाठी प्राध्यापकांच्या नियुक्त्या करण्याचे या निमित्ताने प्रयोजन होते. या सर्वच वातावरणात 'गड्या आपुला गाव बरा' यापेक्षाही अनेकांचे लक्ष पैलतीरी म्हणजे साता समुद्रापलीकडच्या या रम्यनगरीमध्ये लागले. 'आकांक्षा' हे या मानसिकतेचे नाव. गेल्या काही वर्षात याला जोड मिळाली ती मुबलक अर्थपुरवठ्याची. शंभरात फार फार तर वीस विद्यार्थी जर पूर्ण शिष्यवृत्ती मिळवून परदेशात जात असतील, तर उरलेले ७०-८० टक्के विद्यार्थी आई-वडिलांच्या पुण्याईवर म्हणजेच त्यांच्या आर्थिक मदतीवर किंवा प्रसंगी आई-वडिलांनी बँकेच्या आधाराने शैक्षणिक कजार्चा बोजा पत्करूनसुद्धा आपल्या मुला-मुलींना परदेशी विद्यापीठाचे दरवाजे प्रवेशासाठी उघडून दिले आहेत. असा खर्च निदान ३० ते ७० लाख रुपये सुद्धा असू शकतो. असा अर्थपुरवठा झाल्यानंतर अर्थातच आघाडीच्या चार-पाच विद्यापीठांमध्ये मोक्याच्या जागा भरल्यानंतर, बाकीच्या विद्यापीठांमध्ये या शुल्कांच्या बदल्यात जागा या भारतीय विद्यार्थी विद्यार्थिनी मिळवतात. पुणे, मुंबई येथे अशाप्रकारे परदेशात खात्रीशीर जागा मिळवून देण्यासाठीचे प्रशिक्षणवर्गही अनेक वर्षे सुरू आहेत. त्यामुळे परदेशी जाण्यासाठीची अशी एक समग्र यंत्रणा गेल्या २५ वर्षात आपल्याकडे तयार झाली आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेतील Rutgers विद्यापीठात चाळीस वर्षे काम केलेले एक प्राध्यापक सांगत होते की, या वर्षी त्यांच्याकडे ७० टक्क्यांहून जास्त प्रवेश परदेशी विद्यार्थ्यांचे आहेत व त्यात बहुसंख्य भारतीय आहेत! जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये हे असे होणारच. त्यात चूक काय, असा प्रश्न विचारता येईल. जिथे प्रगतीची संधी जास्त आहे असे वाटते, तेथे भारतीय नागरिक जाणारच आणि त्याबद्दल गळे काढून चालणार नाही, असा एक मतप्रवाह आहे.

मनुष्यशक्तीचा खड्डा

भारतापेक्षा परदेशी विद्यापीठात शिक्षणाचा दर्जा उत्तम आहे, ही काहीशी खरी व काहीशी लंगडी सबब सांगून अनेक जण त्या ठिकाणी अभ्यासासाठी दाखल होतात. त्याची पुढची पायरी म्हणजे अभ्यासक्रम संपल्यानंतर तीन महिने- सहा महिने कायार्नुभव किंवा अप्रेंटिशिप किंवा कमी पगारावर काम करून त्या ठिकाणीच बस्तान बसवतात व मग पूर्णवेळेची नोकरी. मग चांगल्या पगाराची नोकरी. सुरुवातीला भाड्याचे घर, नंतर स्वतःचे घर, भाड्याची गाडी व स्वतःची गाडी असे एकेक चक्र होत हे भारतीय युवक व युवती अमेरिकेचे ग्रीन कार्ड मिळवण्याचे स्वप्न कधी पुरे होईल, यासाठी रांगेमध्ये क्रमांक लावतात. ज्याला जिथे जायचे आहे तिथे स्वतःच्या हिंमतीवर जावे, सुखाने शिकावे व स्वतःच्या हिमतीने बखळ पैसे कमवावे, असाच एकूण अर्थव्यवस्थेचा पाया आहे. त्याला नैतिक किंवा सामाजिक बंधनात कसे काय अडकवणार? अशा लाखो बुद्धिमान युवकांनी परदेशाची वाट जर चोखाळली तर आपला देश या मोठ्या ताकदीला हरवून बसतो आहे व अशी गळती आपणास परवडणारी आहे का, असा प्रश्न मनात निर्माण होतो. दरवर्षी दोन लक्ष गुणिले दहा वर्षे जवळपास २० लाख मनुष्यशक्तीचा खड्डा आपल्या देशाच्या शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक व तंत्रज्ञान क्षेत्राला लाभलेला मोठा फटका आहे. याला प्रतिवाद म्हणून काहीजण मोजकी उदाहरणे देतात.

तिथे 'गुगल'मध्ये नाही का सुंदर पिचाई आणि अमुक आणि तमुक भारतीय आहेत. इंद्राणी नुयी आणि जागतिक बँकेतील बांगा भारतीय नाहीत का, असा प्रश्न विचारला जातो. असे भारतीय म्हणजे भारताची 'सॉफ्ट पॉवर' असेही सांगितले जाते. ही उदाहरणे ही तशी चुकीची नाहीत; फक्त त्यामध्ये एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, म्हणजे तथाकथित भारतीय किंवा अनिवासी किंवा प्रवासी भारतीय यांची 'पहिली निष्ठा' ही हे ज्या संस्थेमध्ये व ज्या देशांमध्ये काम करतात त्या संस्थेच्या व देशाच्या भरभराटीसाठीच असणार.

गुगल मध्ये अमुक एक पदावर अमुक एक भारतीय काम करतो म्हणजे 'गुगल' भारतासाठी काम करेल, भारताच्या हितासाठी काम करेल असे नाही. त्या ठिकाणी असलेला प्रत्येकच कर्मचारी 'गुगल'चा नफा सगळ्यात जास्त कसा वाढेल किंवा अमेरिकेचा सगळ्यात जास्त फायदा कसा होईल, याकडेच बघणार. त्या ठिकाणी दुहेरी निष्ठा नाही!

ज्या विद्यापीठात गोपनीय संशोधन चालू असेल तर ते करणारा अनिवासी भारतीय परदेशातील तंत्रज्ञान देऊ करणार नाही. 'नासा'मध्ये कितीही भारतीय आहेत, याचा आम्ही अनेक वर्षे फुकाचा तोरा बाळगला तरी 'नासा'ने आपल्याकडील अणुचाचण्यांनंतर भारतावर बंदी आणल्यानंतर त्या देशी शास्त्रज्ञांना काहीही करता आले नाही! त्यांची पहिली व कायम निष्ठा ही अमेरिकेप्रतीच होती. एरवी गणेशोत्सवात 'गणपती बाप्पा मोरया' गर्जना करून न्यूजर्सीच्या रस्त्यावर अनेक युवक जरी उतरले तरी अनंत चतुर्दशीची रात्र संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी जेव्हा एखाद्या अमेरिकन व युरोपच्या उद्योग समूहात ते कामाला जातील व 'ग्रीन कार्ड'च्या रांगेत उभे राहतील, त्यावेळेला ते शपथ घेणार ती अमेरिकेच्या नागरिकत्वाची व त्या देशालाच एकनिष्ठ राहण्याची! त्यामुळे त्यावेळी दुहेरी निष्ठा चालणार नाही आणि तशी असणे अपेक्षितही नाही! त्यामुळे आपण असे अनिवासी भारतीय हे आपल्या देशाचे वैभव आहे असा जरी किती डंका पिटला तरी तो बऱ्याच अंशी पोकळ आहे, याचे आपल्याला जेवढे लवकर भान येईल तेवढे बरे.

# ऊर्जा संक्रमणासाठी हवे योग्य धोरण

ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व लोकनेते, जीवाश्म इंधनापासून अक्षय्यतेकडे वेगाने बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे करणे अर्थातच आवश्यकही आहे; परंतु हे संक्रमण करताना दृष्टिकोन विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक हवा. 'टूबी ऑर नॉट टू बी' या शेक्सपिअरियन विधानासारखी काहीशी गत जीवाश्म इंधनाची झाली आहे. ऊर्जा संक्रमण, हवामान बदलाच्या या काळात, ऊर्जा उद्योग व या क्षेत्राशी निगडित विविध घटक गेल्या काही वर्षात परिवर्तनशील स्थितीत आहेत. जीवाश्म इंधनाची नियोजित समाप्ती हा जागतिक पातळीवर विवादाचा व गंभीर विश्लेषणाचा विषय बनला आहे. नुकतीच दुबईत पार पडलेली उडढ २८ ची परिषद काय, ऊसापासून इथेनॉल उत्पादनावर तात्पुरती बंदी घालण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय काय किंवा रण ऑफ कच्छ सौर आणि पवन प्रकल्प काय, एकूणच ऊजेर्चा प्रश्न प्रकाशझोतात आला आहे. जीवाश्म इंधन हा आजच्या आधुनिक, औद्योगिक युगासाठी ऊजेर्चा एक प्रमुख स्त्रोत आहे. तो मानवी जीवनाचा, जागतिक अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. जीवाश्म इंधनावर आधारित जीवनशैलीत बदल घडवून आणणे हे सोपे नाही. परिणामतः हे संक्रमण सोपे असणार नाही. जीवाश्म इंधन - वापराद्वारे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनामुळे होणारे हरितगृह परिणाम आणि हवामान बदल ही वैज्ञानिक वस्तुस्थिती जरी असली तरी, तपशीलात काही मतभेद आहेत. जीवाश्म इंधने ही हवामानबदलाचे दोषी नसून हवामानबदल हा सृष्टीतील एक नैसर्गिक बदल आहे, असे वादाकरिता गृहीत धरले तरीही आपल्या जीवनशैलीत पयार्यी ऊर्जास्त्रोतांचा समावेश करणे आवश्यक आहे. याचे कारण जीवाश्म इंधने तांत्रिकदृष्ट्या पुनर्नवीकरणाची क्षमता राखत नाहीत. म्हणजेच जीवाश्म इंधनाची उपलब्धी सीमित आहे.

कार्बन डायऑक्साईड, मिथेन, व इतर हरितगृह वायूंचे पृथ्वीभोवती आवरण निर्माण झाले आहे, ज्यामुळे जागतिक तापमान वाढून आजची हवामानबदलाची स्थिती निर्माण झाली आहे. निव्वळ शून्य राखण्यासाठी किंवा १.५ अंशांच्या सुरक्षित मयार्देत जागतिक तापमानवाढ स्थिर ठेवण्यासाठी हे कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह आवरण काढून टाकणे अथवा कमी करणे आवश्यक आहे.

१९८१मध्ये शास्त्रज्ञांनी ग्लोबल वॉर्मिंगची नोंद घेण्यास सुरुवात केल्यापासून डीकार्बनायझेशनच्या (वातावरणातून कार्बनचे प्रमाण कमी करणे) विविध पद्धती व उपक्रम राबवले गेले आहेत. सुरुवातीस त्यात जंगलतोड कमी करणे, वनीकरण, काही प्रमाणात सौर ऊर्जा व पवन ऊजेर्चा विकास व वापर, इत्यादीसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. तरीही अक्षय ऊर्जेच्या स्त्रोतांचा विकास आणि व्यापक वापर ही डेकार्बनायझेशनच्या उद्दिष्टाच्या दिशेने काम करण्याची सर्वात वास्तविक पद्धत आहे. गेल्या शतकाच्या अंती, सौर व पवन ऊजेर्चा विकास केला गेला. विविध पद्धतीद्वारे डीकार्बनायझेशन वाढवणे, ऊर्जाप्रणालीत अक्षय ऊर्जास्त्रोतांचा समावेश वाढवणे व त्याचबरोबर जीवाश्म इंधनाचा वापर कमी करणे हा ऊर्जा संक्रमणासाठी योग्य रोड मॅप ठरवला गेला आहे. हे उद्दिष्ट समोर ठेऊन आज जगातील



ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व लोकनेते, जीवाश्म इंधनापासून अक्षय्यतेकडे वेगाने बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत. हे आवश्यक आहे; परंतु या बदलाबाबत दृष्टिकोन विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक हवा. ऊर्जा प्रणालीतील बदल, ऊर्जा संक्रमण हे जबाबदारीने होणे आवश्यक आहे. कोणतीही ऊर्जाप्रणाली ही समाजमान्य होण्यासाठी ती मुळात सामान्य माणसास सहज, सुलभरीत्या उपलब्ध असणारी व परवडणारी असणे गरजेचे असते. गेल्या १०० वर्षांत जागतिक स्तरावर ऊजेर्चे प्राथमिक स्त्रोत म्हणून जीवाश्म इंधनाची प्रगती, त्याचे आज वातावरणावर होणारे परिणाम याचा तज्ज्ञ, धोरणकर्ते यांनी काळजीपूर्वक अभ्यास करून निर्णय घ्यायला हवेत. सध्या जरी नूतनीकरणक्षम ऊर्जा स्त्रोतांचा एकूण ऊजार्वापरात केवळ २० टक्केच समावेश असला तरी, हवामान कृती अंतर्गत, पुढील दशकांमध्ये ऊजार्वापरात अक्षय ऊर्जा स्त्रोतांची उपस्थिती अनेक पटींनी वाढवावी लागेल. त्यासाठी ऊजार्संबंधित सामाजिक-आर्थिक धोरण बदलावे लागेल.

अविवेकी वापर नडला

जेव्हा जीवाश्म इंधने प्रथम वापरात आली, तेव्हा ती तात्काळ लोकप्रिय होणे, यामागे कारणे विविध होती. स्वस्त, सुलभ उपलब्धता ही कारणे महत्त्वाची. औद्योगीकरण, कृषी क्षेत्र, वाहतूकप्रणाली हे कोणत्याही देशाची प्रगती व अर्थकारण चालवणारे घटक जीवाश्म इंधनावर धावू लागले. मात्र या वाटेवर कुठेतरी, जागतिक पातळीवर ऊजेर्चा प्राथमिक स्त्रोत म्हणून जीवाश्म इंधनाचा घाईघाईने अविवेकीपणे वापर केला गेला. भांडवलशाही दृष्टिकोन आणि विकासाचे स्वीकारलेले प्रारूप यामुळे जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल वेगाने वाढत गेले. तीच चूक पुनः होणे, हे अविवेकी ठरेल व आजचे ऊर्जा संक्रमणासाठीचे प्रयास भविष्यात फलस्वरूपी निरर्थक ठरू शकतील. त्यामुळेच आज येथे एक सावध विराम आवश्यक आहे. आज पुन्हा ऊर्जाप्रणालीबाबत विचार करायला हवा. सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि यासारख्या अक्षय्य ऊर्जास्त्रोतांच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. जीवाश्म इंधन कधीतरी संपुष्टात येणारच, ज्यामुळे पयार्यांची गरज आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल ही वस्तुस्थिती असल्याने वातावरण प्रदूषित न करणाऱ्या ऊर्जास्रोतांची गरज आहे. पण ऊर्जा संक्रमणाचा दृष्टिकोन खऱ्या अर्थाने सामाजिक, लोकतांत्रिक असला पाहिजे.

भविष्यात उभ्या राहणाऱ्या विस्तीर्ण सोलर फार्म्स व पार्क्स, विंड फार्म्स इत्यादींच्या संभाव्य दुष्परिणामांचा अंदाज लावू शकतील अशा वैज्ञानिक व त्याचबरोबर सामाजिक - आर्थिक प्रारूपांचा तपशीलवार अभ्यास करणे आवश्यक आहे. कर्नाटकातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सामाजिक- आर्थिक दुष्परिणामांचे अहवाल दुर्लक्षिता येणार नाहीत. विविध अक्षय ऊर्जाप्रणालीचा मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकार जी आर्थिक गुंतवणूक करते, ती अत्यंत मोठी असते. या गुंतवणुकीत देशाच्या करदात्यांच्या पैशांचाही समावेश आहे. त्यामुळे मोठ मोठ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यापूर्वी, एक पाऊल मागे सरून, भविष्यातील चांगल्या व वाईट दोन्ही परिणामांचा खोलवर अभ्यास असावा. त्यामुळे सरकार, धोरणकर्ते, उद्योग नेत्यांनी नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील सखोल संशोधन आणि विकासाच्या प्रश्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि केवळ सौर, हायड्रोजन, पवन इत्यादी ऊर्जास्त्रोतांच्या सध्या उपलब्ध साधनांवरच फक्त लक्ष केंद्रित न करता, इतर नवीन कल्पना, पर्यायदेखील विकसित करण्यासाठी वैज्ञानिक प्रयत्न हवेत.

भविष्यात अक्षय्य ऊर्जास्त्रोतांच्या व्यापक वापराचा नकारात्मक परिणामाचा अभ्यास केवळ पर्यावरणापुरता मर्यादित न ठेवता, वाढत्या लोकसंख्येशी थेट निगडित असलेले अन्न, निवारा, यासारख्या मानवी जीवनातील इतर महत्त्वाच्या घटकांचाही विचार झाला पाहिजे. प्रत्येक देशात समान गतीने ऊर्जा संक्रमण घडवून आणण्याची सक्ती चुकीची ठरेल. आर्थिकदृष्ट्या कमकुवत राष्ट्रे ऊर्जा संक्रमणाची गतिमान जबाबदारी पेलू शकतीलच, असे नाही.

अशा राष्ट्रांना धनाढ्य विकसित राष्ट्रांनी आर्थिक सहाय्य पुरविणे हे केवळ चर्चा व कागदोपत्री असणे ठीक नाही. हवामान बदल हा जगाच्या हिताचा प्रश्न आहे. तथापि ऊर्जा संक्रमणाची जबाबदारी पार पाडण्यास हरेक राष्ट्राने आपापली भूमिका ओळखून हा संक्रमणाचा मार्ग सर्वांसाठी सुलभ केला पाहिजे.

१.५ अंश तापमानाचे लक्ष्य साध्य करण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने विकास जाणीवपूर्वक व सातत्यपूर्ण असावा. अन्यथा शाश्वत व न्याय्यपूर्ण अशा पर्यावरणीय आणि आरोग्यदृष्ट्या सुरक्षित ऊर्जा मॉडेल अंतर्गत १.५ अंश लक्ष्य गाठणे अशक्य होईल. ऊर्जा संक्रमणाचे युग, हे जीवाश्म इंधनाच्या युगाप्रमाणेच तात्पुरते ठरेल. या संक्रमणातून मानवतेला योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी जागतिक लोकनेते, ऊर्जातज्ज्ञ तसेच धोरणकर्त्यांनी विवेकाने निभावली पाहिजे.

# रसेल यांच्या नजरेतून चीन

भारताचा चीनशी प्राचीन काळापासून साहित्य, संगीत, भाषा, धर्म आणि तत्त्वज्ञान या संदर्भात मूलतः सांस्कृतिक आणि तात्त्विक अनुबंध आहे. तो आणखी दोन प्रकारचा आहे. पहिला प्राचीन वांशिक अनुबंध आणि दुसरा आधुनिक व्यापारी व भू-राजकीय अनुबंध. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, भारतीय समाज ऑस्ट्रिक, द्रविड आणि वैदिक आर्य या तीन वंशांनी मिळून बनला आहेच; पण त्याखेरीज इंडो-युरोपीयन व चिनी-तिबेटी वंशाचे मिश्रणही आजच्या भारतीय समाजात आढळते. भाषिक व वैवाहिक नात्यांनी हा समाज बनला होता. दुसरीकडे आधुनिक व्यापारी संबंध आणि भू-राजकीय अनुबंधही दोघांत आहेत. अशा प्रकारे भारत-चीन-तिबेट नाते हा नव्या शोधाचा विषय बनतो. चीन आणि जगाच्या तात्त्विक व राजकीय नात्याचे स्वरूप सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्ट्रांड रसेलने शंभर वर्षांपूर्वी, १९२२च्या दरम्यान आपल्या दि प्रॉब्लेम ऑफ चायना या पुस्तकात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. चीनमधील विवेकवाद्यांनी आणि शांघाय पत्रकार संघाने १९२०दरम्यान रसेल यांना व्याख्याने देण्यासाठी निमंत्रण दिले होते. चीनमध्ये दहा महिने राहून त्यांनी तेथे विविध विषयांवर व्याख्याने दिली. हे पुस्तक त्या व्याख्यानांवर आधारलेले आहे. त्यात रसेल चीनच्या तत्त्वज्ञानात्मक व बौद्धिक इतिहासाची चर्चा करतात. त्या इतिहासानेच चीनच्या आर्थिक व विज्ञान-तंत्रज्ञान विकासाला कसे वळण दिले, ते स्पष्ट करतात. चीनच्या सांस्कृतिक विकासाचा आधार कन्फ्युशियसचे राष्ट्रवादी तत्त्वज्ञान, लाओत्सेचा ताओवाद आणि चिनी बुद्धवाद हा आहे. परिणामी अनेक शतके चिनी प्रशासन, राजकारणावर विचारवंत, साहित्यिक आणि बुद्धिजीवी यांचा प्रभाव आहे, हे रसेल अधोरेखित करतात. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात ते लिहितात, की आपली नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या आणि उच्च राष्ट्रभक्तीची भावना यांच्या बळावर चीन एक दिवस अमेरिकेपेक्षा अधिक शक्तिशाली महासत्ता बनेल. त्याचवेळेस तो सावधगिरीचा इशारा देतो की, राष्ट्रभक्ती संरक्षणासाठी पुरेशी बलशाली झाली असे सिद्ध झाले की इतर राष्ट्रांवर आक्रमण करू पाहते. आपल्याच नागरिकांवर अत्याचार करू लागते. त्यामुळे त्या देशाचीच नव्हे तर सबंध जागतिक शांतता धोक्यात येते.

हा अतिरेकी राष्ट्रभक्तीचा धोका असतो. रसेल लिहितात, आधुनिक समजला जाणारा पाश्चात्य माणूस जगात स्वार्थी बदल घडवून विकास करू पाहतो, तर सर्वसाधारण चिनी माणूस (किंवा कोणत्याही देशाचा सामान्य नागरिक) आपली संस्कृती जपत जास्तीत जास्त नजाकतीने सभ्य व आनंदी राहण्याचा प्रयत्न करतो. पाश्चात्य लोकांना विकास म्हणजे केवळ भौतिक विकास वाटतो; विकास म्हणजे भौतिक विकासासह मानसिक विकास साधणे. प्रजेने आनंदी असणे हे त्याचे प्रमुख लक्षण. विद्यमान चिनी राज्यकर्तेच काय, जगातील सारेच राज्यकर्ते हे तत्त्व विसरून जाताहेत, असे आढळते. आज आपण पाहतो की, चीनने कन्फ्युशियसचे ह्यअपत्याचे राष्ट्रार्पण (प्र'' स्त्री३८) म्हणजे प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबानंतर राष्ट्र हेच कुटुंब मानून आपले किमान एकतरी अपत्य राष्ट्रसेवेसाठी अर्पण करावे, या धोरणाचे काटेकोर पुनरुज्जीवन केले. त्याच वेळेस राज्यकर्त्यांनी कन्फ्युशियसची तत्त्ववेत्ता राजा आणि आदर्श राजधर्म या संकल्पनांची मोडतोड केली. रसेल म्हणतात, चीन जो काही विकास करेल त्यामुळे सारे जग मुळापासून खोलवर प्रभावित होईल.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र


४

मुंबई, मंगळवार, २ जानेवारी ते ८ जानेवारी २०२४


## विठ्ठलवाडी- कल्याण नगर उन्नत मार्गाला मंजुरी, एमएमआरडीएकडून ६४२.९८ कोटींची प्रशासकीय मान्यता

**■ठाणे। प्रतिनिधी,**

कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग, कल्याण बदलापूर राज्यमार्ग आणि जुना पुणे लिंक रस्त्याला जोडणाऱ्या महत्वाकांक्षी उन्नत मार्गाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ६४२.९८ कोटी रूपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. सध्या विठ्ठलवाडी ते कल्याण असा थेट मार्ग नसल्याने सुमारे ४० ते ६० मिनीटे खर्ची पडतात. या उन्नत मार्गामुळे हे अंतर पाच मिनिटांवर येणार आहे. या मार्गात दोन रेल्वे मार्ग ओलांडावे लागणार असून वालधुनी नदीला समांतर विठ्ठलवाडी ते कल्याण




अहमदनगर राज्यमार्गापर्यंत या मागाची उभारणी केली जाणार आहे.

राज्यमार्ग, महामार्ग एकमेकांना जोडले नसल्याने अनेकदा मोठा वळसा घालून प्रवास करावा लागतो. त्यामुळे इंधन, वेळ आणि श्रम खर्च होतात. कल्याण, उल्हासनगर ही शहरे एकमेकांना खेटून आहेत. मात्र भौगोलिक रचना, वालधुनी नदी आणि थेट मार्गाच्या अभावामुळे शहराची दोन टोक एकमेकांपासून दूर असल्यासारखी वाटतात. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील विठ्ठलवाडी परिसर ते कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग यांना जोडण्यासाठी थेट मार्ग नसल्याने विठ्ठलवाडीतून जुन्या पुणे लिंक रस्त्यावरून कल्याण अहमदनगर मार्गावर जाण्यासाठी एकतर कल्याण शहरातून प्रवास करावा लागतो. उल्हासनगर शहरातून कल्याण बदलापूर राज्यमार्ग ओलांडून वर्दळीच्या भागातून जावे लागते. नगर महामार्ग, कल्याण बदलापूर राज्यमार्ग आणि जुना पुणे लिंक रस्ता एकमेकांना जोडलेला नाही. त्यामुळे येथे थेट उन्नत मार्ग उभारण्याची कल्पना स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मांडली होती. त्यासाठी कल्याण डोंबिवली महापालिकेने सविस्तर आराखडा तयार केला. कल्याण ते कर्जत आणि कसारा असे दोन रेल्वे मार्ग, तीन महामार्ग जोडणारा हा रस्ता उभारण्यासाठी नुकत्याच झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ६४२.९८ कोटी रूपयांच्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी एकूण ३८ हजार १६०चौरस मीटर जागेचे भूसंपादन आवश्यक असून, त्यापैकी २३ हजार ९५१चौरस मीटर क्षेत्रफळाचे भूसंपादन झालेले आहे. उर्वरित क्षेत्रफळ हस्तांतरीत विकास अधिकार (TDR) च्या माध्यमातून ताब्यात घेण्याची प्रक्रिया कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत सुरू आहे.

## तुर्भे स्टोअर पूल कामामुळे वाहतूक संथगती; एकदोन दिवसांत वाहतूक नियमित होईल असा विश्वास

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या २० वर्षांपासून रखडलेल्या तुर्भे रेल्वे स्थानकासमोरील रस्त्याचा प्रश्न अखेर उड्डाणपुलाच्या मार्गाने मार्गी लागला आहे. याचे काम नुकतेच सुरु करण्यात आले खरे मात्र पहिल्या तीन दिवसांत वाहतूक कोंडीने वाहनचालक हैराण झाले. शनिवारी जवळपास रात्रभर पोलीस उपायुक्त स्वतः या ठिकाणी उपस्थित होते. ही परिस्थिती नेहमी राहणार नसून एक-दोन दिवसांत वाहतूक बदल लक्षात येऊन कोंडी सुटेल अशी अपेक्षा वाहतूक पोलिसांकडून व्यक्त करण्यात आली आहे. तुर्भे स्थानकासमोरील उड्डाणपुलाचे काम शुक्रवारपासून सुरु झाले.

त्यामुळे अवजड वाहनांना या रस्त्यावरून मार्गक्रमण करण्यास बंदी घालण्यात आली तर ३ पर्यायी मार्गही देण्यात आले. त्यात नेहमीच मार्गात बदल केल्यावर सुरुवातीचे काही दिवस तारेवरची कसरत वाहनचालक आणि पोलिसांनाही करावी लागते. मात्र शुक्रवारी काम सुरू झाले आणि शनिवार-रविवार लागून सुट्ट्या तसेच



सोमवारी नाताळ अशा सलग तीन सुट्ट्या आल्याने वाहतुकीत प्रचंड वाढ झाली. त्यामुळे वाहतूक कोंडी पर्यायी मार्ग आणि या ठिकाणी सुद्धा झाली होती. शनिवारी आणि रविवारी रात्री तर पावणेच्या पुढे वाहनांची रांग गेली होती. स्वतः पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे हे रात्री आठ ते पहाटे चार पर्यंत याच भागात पाहणी करीत होते व योग्य ते निर्देश देत होते. सुरुवातीचे काही तास सोडले तर रात्रभर वाहतूक धीम्या गतीने सुरु होती. तर रविवारी दुपारी आणि रात्रीही सुट्टीसाठी बाहेर जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत घट आल्याने वाहतूक कोंडी फारशी झाली नाही.

## शक्ती कायद्याला केंद्र सरकारचा खोडा, दीपिका चव्हाण यांची तक्रार



**■मालेगाव। प्रतिनिधी,**

महाविकास आघाडीने राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर शिक्षेची तरतूद असलेला 'शक्ती' कायदा संमत केला. मात्र हा कायदा भारतीय दंड संहितेतील काही तरतुदींचा अधिक्षेप करणारा असल्याचे कारण पुढे करत केंद्रातील भाजप सरकारने या महत्वपूर्ण कायद्याला खोडा घातल्याची तक्रार माजी आमदार व राज्य महिला आयोगाच्या सदस्या दीपिका चव्हाण यांनी केली आहे. या संदर्भात चव्हाण यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा कायदा तातडीने लागू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा मागणीचे निवेदन दिले. राज्यातील लहान-मोठ्या शहरांमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अशा घटनांमधील आरोपींना तत्काळ कडक शासन व्हावे आणि पीडित महिलांना न्याय मिळावा म्हणून महाविकास आघाडी सरकारच्या काळात विधानसभेत 'शक्ती' कायदा संमत केला गेला होता. यामध्ये गुन्हेगारांना तत्काळ कठोर शिक्षेच्या तरतुदीदेखील करण्यात आल्या आहेत. मात्र शक्ती कायद्यातील काही बाबी भारतीय दंड संहितेतील तरतुदींचा अधिक्षेप करणाऱ्या असल्याचे कारण पुढे करीत केंद्र सरकारने या महत्वपूर्ण कायद्याला आक्षेप घेत त्यात खोडा घालण्याचे काम केले, अशी तक्रार चव्हाण यांनी निवेदनात केली.

## देहूरोड, दिघी रेडझोन हद्दीचा अचूक नकाशा प्रसिद्ध होणार, महापालिकेने घेतला 'हा' निर्णय




**■पिंपरी। प्रतिनिधी,**

देहूरोड आणि दिघी भागातील संरक्षित जागेची (रेडझोन) महापालिका नव्याने मोजणी करणार आहे. त्यासाठी एक कोटी १३ लाख ६७ हजार मोजणी शुल्क भूमी अभिलेख विभागाच्या पिंपरी-चिंचवड आणि हवेली विभागाकडे जमा करण्यात येणार आहे. मोजणीमुळे नवीन अचूक, स्पष्ट रेडझोनचा नकाशा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रेडझोनच्या सीमेबाबतचा संभ्रम दूर होईल. पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड आणि दिघीत संरक्षण विभागाचे क्षेत्र आहे. देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या आणि दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) परिघामध्ये रेडझोन आहे. रेडझोनमध्ये कोणतेही बांधकाम करता येत नसतानाही अनधिकृतपणे निवासी बांधकामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. जुने, बैठे घर असलेल्या रहिवाशांना नव्याने बांधकाम करता येत नाही. रेडझोनच्या हद्दीमध्ये नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने मोजणीची मागणी केली जात होती. महापालिका रेडझोन बाधित क्षेत्राची मोजणी करणार आहे. पिंपरीतील भूमी अभिलेख विभागाच्या नगर भूमापन अधिका-यांकडून देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या बाह्य सीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड परिघातील शहरातील हद्दीची मोजणी केली जाणार आहे. त्यासाठी एक कोटी सात लाख रुपये शुल्क दिले जाणार आहे. तर, हवेली भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक हे दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून दोन हजार यार्ड रेडझोन परिसराची मोजणी करणार आहेत.

## ज्येष्ठांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांच्या उपाययोजना काय?



**■मुंबई। प्रतिनिधी,**

सांस्कृतिक वारसा लाभलेल्या विलेपार्ल्यासह मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांना विविध समस्यांना समोरे जावे लागते. या समस्या कशी दूर करता येतील? एकटया राहणाऱ्या ज्येष्ठांच्या सुरक्षेचे काय? कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान पोलीस कसे पेलतात, आदी विषय थेट मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडून जाणून घेण्याची संधी पार्लेकरांना मिळणार आहे. मुली आणि महिलांच्या सुरक्षेचे काय? बदलत्या सामजिक वातावरणात शहरातील कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान पोलीस कसे पेलणार? याविषयी नागरिकांना पोलिसांची भूमिका समजून घेता येईल. पश्चिम द्रुतगती मार्गाजवळ अनेकदा वाहतूक कोंडी निर्माण होते. विमानतळ परिसरात नेहरू रस्ता तसेच सहार रस्त्यावर सायंकाळी वाहतूक कोंडीमध्ये वेळ वाया जातो. पार्लेश्वर मंदिराकडून पूर्व-पश्चिम प्रवास करतानाही वाहतूक मंदावते. उपनगरात विविध ठिकाणी चाललेल्या विकासकामांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा प्रश्न उद्भवतो.

पार्ल्यात वाहनतळाचीही समस्या आहे. याशिवाय, अन्य समस्या पोलिसांच्या मदतीने कशा सोडवता येतील, हे पार्लेकरांना जाणून घेता येईल. शहरातील शांतता अबाधित राहावी यासाठी दक्ष असणाऱ्या पोलीस यंत्रणेशी संवादाचे हे पर्व आहे. मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर या कार्यक्रमात नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

## दुचाकीच्या धडकेत महिला पोलीस अधिकारी गंभीर जखमी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

भरधाव वेगात असलेल्या दुचाकी चालकाने एका महिला पोलीस अधिकाऱ्याला जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री मुलुंड परिसरात घडली आहे. या अपघातात महिला पोलीस अधिकारी गंभीर जखमी झाली असून मुलुंड पोलिसांनी दुचाकी चालकाला अटक केली आहे. मुलुंड पोलीस ठाण्याच्या बाहेर मंगळवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास ही घटना घडली आहे.

याच पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पूजा धाकतोडे या मंगळवारी रात्री काही सहकाऱ्यांसह परिसरात गस्त घालण्यासाठी निघाल्या होत्या. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पोलीस व्हॅन उभी असल्याने त्या रस्ता ओलांडताना अचानक एक दुचाकी भरधाव वेगात तेथे आली. या दुचाकीवर तिघेजण होते. त्यांनी




महिला अधिकाऱ्याला जबर धडक दिल्याने महिला अधिकारी काही अंतरावर जाऊन आदळली. पोलीस ठाण्यासमोरच हा भीषण अपघात झाल्याने तत्काळ पोलीस ठाण्यातील इतर कर्मचाऱ्यांनी महिला अधिकाऱ्याला एका खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. या अपघातात त्यांच्या नाकाला आणि तोंडाला जबर मार लागला असून त्यांच्यावर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. मुलुंड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून दुचाकी चालक अरविंद यादव याला अटक केली आहे.

## 'अर्बन हाट'वर पालिकेचा दावा, सिडकोच्या भाडेपट्टा करारास महापालिकेची हरकत



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

शहरातील एक महत्त्वाचा शासकीय टापू असणाऱ्या सीबीडी बेलापूर भागातील एका निसर्गरम्य टेकडीवर सिडकोने दोन दशकांपूर्वी वसविलेल्या अर्बन हाट (कलाग्राम) या कला, खाद्यासंस्कृती आणि सांस्कृतिक उपक्रमांचे मिश्रण असलेल्या सांस्कृतिक केंद्रावर नवी मुंबई महापालिकेने दावा सांगितला आहे. वेगवेगळ्या राज्यांतील समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हस्तकला, कलावस्तूंच्या व्यापक प्रदर्शनांचे ठिकाणासाठी प्रसिद्ध असणारे हे केंद्र पुढील दहा वर्षांसाठी भाडेपट्ट्यावर देण्याचा प्रस्ताव सिडकोने तयार केला आहे. या प्रस्तावास हरकत घेत महापालिकेने हे संपूर्ण केंद्र महापालिकेस चालविण्यास द्यावे अशा स्वरूपाचा नवा प्रस्ताव सिडकोपुढे ठेवला आहे. नवी मुंबईसारख्या शहरात देशातील वेगवेगळ्या प्रांतातील लोककलेला एक बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी सिडकोने सीबीडी बेलापूर सेक्टर १५ येथील मध्यवर्ती ठिकाणी काही वर्षांपूर्वी अर्बन हाटची उभारणी केली. सिडकोच्या बहुचर्चित कलाग्राम उपक्रमाच्या माध्यमातून बेलापूर रेल्वे स्थानकामागे असलेल्या एका निसर्गरम्य टेकडीवर पाच हेक्टर क्षेत्रफळात या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली.

निसर्गरम्यतेमुळे हे स्थान विरंगुळ्यासाठी योग्य ठरल्याने सुरुवातीच्या काळात या ठिकाणी फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी होती. याशिवाय या ठिकाणी सिडकोमार्फत कला, खाद्यासंस्कृती आणि वेगवेगळे सांस्कृतिक उपक्रमही नियमित भरविले जात असतात. विविध राज्यांमधील समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हस्तकला, कलावस्तूंचे व्यापक प्रदर्शन तसेच विक्री केंद्र येथे उभे राहावे यासाठी सिडकोने नेमलेल्या खासगी संस्थेकडून प्रयत्न केले जात असतात. ग्रामीण कलावंतांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीनेही राज्य सरकारच्या वेगवेगळ्या विभागांमार्फत या ठिकाणी प्रदर्शो भरविली जात असतात. हातमाग, हस्तकलेचे प्रदर्शन, वसंत मेळा, हिवाळी प्रदर्शन तसेच वेगवेगळ्या खाद्या महोत्सवांचीदेखील या ठिकाणी अधूनमधून रेलचेल असते. वार्षिक स्नेहसंमेलनासाठी या ठिकाणी ॲम्पीथिएटरची उभारणीही सिडकोने केली आहे. अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या केंद्राला कोविडकाळात मात्र उतरती कळा लागल्याचे पाहायला मिळाले होते.

असे असले तरी सिडकोच्या या भाडेपट्टा करारास नवी मुंबई महापालिकेने हरकत घेतली असून मोक्याच्या ठिकाणचे हे अर्बन हाट हस्तांतरित करावे अशी मागणी सिडकोकडे केली आहे. हे केंद्र नवी मुंबई महापालिका हद्दीत असून या केंद्राचा मूळ उद्देश आबाधित राखून ते प्रभावीपणे चालविण्यासाठी ते विनाशुल्क हस्तांतरित केले जावे असा प्रस्ताव महापालिकेने सिडकोकडे दिला आहे. आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फत लवकरच या केंद्राचा पाहणी दौरा केला जाणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकाकडून अल्पवयीन मुलींशी अश्लील कृत्य



**■पुणे। प्रतिनिधी,**

घरासमोर खेळणाऱ्या मुलींशी अश्लील कृत्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, एका ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार कर्वेनगर भागात राहायला आहे.


तक्रारदाराची सात वर्षांची मुलगी आणि शेजाऱ्यांची आठ वर्षांची मुलगी घरासमोर असलेल्या पटांगणात खेळत होत्या. त्यावेळी ज्येष्ठ नागरिक तेथे आला. त्याने अल्पवयीन मुलींशी अश्लील कृत्य केले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या मुलींशी पुन्हा अश्लील कृत्य केले. मुलींनी याबाबतची माहिती पालकांना दिल्यानंतर तक्रार देण्यात आली. ज्येष्ठ नागरिकाविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक जाधव तपास करत आहेत.

## हिंजवडीत कंपनीतील गॅसभट्टीच्या स्फोटात २० कामगार जखमी; चार कामगारांची प्रकृती गंभीर

**■पिंपरी। प्रतिनिधी,**

हिंजवडी टप्पा एकमधील ॲकॉर्ड ॲटॉकॅम्प प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील गॅसभट्टीचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत २० कामगार जखमी झाले. जखमींपैकी चार कामगारांची प्रकृती गंभीर असून आठ कामगारांना उपचारानंतर घरी सोडून देण्यात आले.

ही घटना मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणी कंपनीचे मालक, प्रशासन तसेच, इतर देखभालीचे काम पाहणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सैफन इस्माईल शेख



(वय २५, रा. चिंचवड), राजनंद सुरेश कौशल्य (वय २७, रा. राक्षेवाडी, माण), लखन सुशील बिझारी (वय ३८, रा. मारूंजी), नागेशकुमार (वय २४) अशी गंभीर जखमी झालेल्या चार कामगारांची नाव आहेत. सागर लक्ष्मण सोलसे (वय ३५, रा. शेळकेवाडी, घोटावडे) या कामगाराने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास १९ कामगार हे वाहनांचे सुट्टे भाग (ॲटोमोबाईल्स पाट्‌र्स) चारचाकी वाहनाच्या गॅस भट्टीच्या ओव्हन मशिनमध्ये कोटींग करीत होते.

यावेळी गॅस भट्टी गरम होवून त्यामध्ये अचानक स्फोट झाला. गॅसभट्टीमधील पावडर कोटींगसाठी ठेवलेले सुट्टे भाग आणि आगीमुळे १९ कामगार जखमी झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. रावेत येथे उपचार घेत असलेल्या चार कामगारांची प्रकृती गंभीर असून २० ते २५ टक्के भाजले आहेत. तर, हिंजवडीत सात कामगारांवर उपचार सुरू असून त्यांच्या हात, पाठीला भाजले आहे. अन्य आठ कामगारांना उपचारानंतर घरी सोडून देण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी स्फोटक गॅस भट्टीची नियमित देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याप्रकरणी कंपनीच्या मालकासह प्रशासन व इतर देखभालीचे काम पाहणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सोन्याबापू देशमुख तपास करीत आहेत.

## ठाणे जिल्ह्यात वर्षभरात सव्वा दोन लाख वाहनांची नोंदणी

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यात १ जानेवारी ते २६ डिसेंबर या कालावधीत सव्वा दोन लाख वाहनांची नोंदणी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक नोंदणी ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात झाली आहे. येथील वाहन नोंदणीची संख्या १ लाख १० हजार ५३१ इतकी आहे. वाहनांमध्ये सर्वाधिक विक्री दुचाकी आणि मोटारींची झाली आहे. तर २०२२ मध्ये याच कालावधीत २ लाख १७ हजार ४५८ वाहनांची विक्री झाली होती. त्यामुळे जिल्ह्यात वाहनांच्या संख्येत दरवर्षी वाढ होत असल्याचे चित्र आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्याकाही वर्षांपासून मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. असे असले तरी अरुंद रस्ते



आणि दुसरीकडे वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहतुक कोंडीचा फटका वाहन चालकांना सहन करावा लागतो. यावर्षी ठाणे जिल्ह्यात २ लाख २६ हजार ६०९ वाहनांच्या विक्रीची नोंद करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक वाहनांची विक्री ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ कल्याण, डोंबिवली आणि नवी मुंबई शहरात वाहनांची नोंद झाली आहे. ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात १ लाख १० हजार ५३१ वाहनांची नोंदणी झाली आहेत. तर डोंबिवली ते बदलापूर येथील ग्रामीण आणि शहरी भागात ७८ हजार ११० वाहनांची नोंद झाली आहे. नवी मुंबईमध्ये ३७ हजार ९६८ वाहनांची नोंद झाली आहे. सर्वाधिक विक्री दुचाकींची झाली आहे. तसेच खासगी मोटार विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. ठाणे, मिरा भाईंदर आणि भिवंडी शहरात ७१ हजार १४१ दुचाकींची विक्री झाली. तर २१ हजार ६६५ नव्या मोटारींची नोंदणी झाली आहे. उर्वरित वाहनांमध्ये खासगी आणि व्यावसायिक वाहनांचा सामावेश आहे.

## हॉटेलच्या वाहन चालकाने केली मोटरीतून दागिन्यांची चोरी



**■मुंबई। प्रतिनिधी,**

हॉटेलच्या वॅलेट पार्किंगमधील वाहन चालकाने मोटरगाडीतील दागिने चोरल्याचा प्रकार उघडकीस आणण्यात बोरीवली येथील एमएचबी पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करून त्याच्याकडून सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार दर्शिल डोडिया (३४) हे माटुंगा किंग्स सर्कल परिसरातील रहिवासी आहेत. ते बोरीवली पश्चिम येथील एका हॉटेलमध्ये १७ डिसेंबरला दुपारी गेले होते. त्यावेळी तेथे उभ्या केलेल्या मोटरीतून २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. हॉटेलमधून बाहेर आल्यावर हा प्रकार डोडिया यांच्या लक्षात आला. त्यानंतर त्यांनी याप्रकरणी एमएचबी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला होता.या गुन्ह्यांच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर व पोलीस निरीक्षक गुन्हे सचिन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश पाटील व त्यांच्या पथकाने तपासाला सुरूवात केली. यावेळी घटनास्थळावरील विविध १० ते १२ सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली असता हॉटेलच्या वॅलेट पार्किंगमधील चालक रमेश बंडू शिंदे (३३) याने डोडिया यांचे दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले. शिंदे याने पार्किंगच्या बहाण्याने डोडिया यांचे वाहन ताब्यात घेतले. काही अंतरावर तो वाहन उभे करताना दिसला व पुन्हा काही वेळातच तेथून संशयास्पद रितीने दुसरीकडे वाहन घेऊन गेला. काही वेळानंतर पुन्हा त्याच ठिकाणी वाहन आणून उभे केले. त्यामुळे वॅलेट पार्किंगच्या चालकावरील संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेऊन चौकशीला सुरूवात केली.

## भरारी पथकांची निष्क्रियता वाळू माफियांच्या पथ्यावर, जिल्ह्यात सर्वत्र दिवस रात्र अवैध वाळू उपसा

**■ठाणे। प्रतिनिधी,**

जिल्ह्यातील नदीपात्रातील आणि खाडीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी काही महिन्यांपूर्वी ठाणे जिल्हा प्रशासनातर्फे भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात भरारी पथकांच्या धडक कारवाईमुळे अवैध रेती उपसा पूर्णपणे बंद झाला होता. या पथकांची धडक मोहीम आता मात्र थंडावल्याने वाळू माफियांना मोकळे रान मिळाले असून मुंब्रा दिवा खाडीत रेतीचा दिवसाढवळ्या अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसून येत आहे.



अशीच परिस्थित कल्याण डोंबिवली येथील खाडी परिसरात देखील दिसून येत आहे. यामुळे जिल्हा महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. ठाणे जिल्ह्यातील दिवा, मुंब्रा, ठाणे, कल्याण येथील खाडी पत्रातून तसेच उल्हासनगर येथील नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात बांधकामासाठी लागणारी वाळू उपलब्ध होते. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यातील रेतीचा अधिकृत लिलाव थांबल्याने येथून अधिकृत वाळू उपसा होत नाही. यामुळे जिल्हा प्रशासनाला मोठ्या महसुलाला मुकावे लागत आहे.

दुसरीकडे अधिकृत रीत्या होणारा वाळू उपसा जरी थांबला असला तरीही माफियांनकडून मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा सुरू आहे. काही महिन्यांपूर्वी मुंब्रा खाडीत रेतीचा दिवसाढवळ्या अवैध उपसा करणाऱ्या माफियांविरुद्ध जिल्हा महसूल अधिकारी कारवाई करिता गेले असता, त्यांच्यावर माफियांकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक थोडक्यात बचावले. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील वाळू माफिया विरोधात सातत्याने धडक कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती. पाच ते सहा महिन्यांपूर्वी या भरारी पथकांची स्थापना करत खाडी आणि नदीपात्रातून अवैध पद्धतीने वाळू उपसा करणाऱ्या माफी आणि विरोधात धडक कारवाई सत्र जिल्हा प्रशासनाने सुरू केले होते.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 1, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898